**औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.**

**दिनांक 26.07.2010 रोजी (का.प.क्रं.05) संपन्न झालेल्या स्थायी समिती अर्थसंकल्पीय सभेचे इतिवृत्त.**

सोमवार दिनांक 26 जुलै 2010 रोजी मा.सभापती श्री.राजू रामराव शिंदे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची अर्थसंकल्पीय सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील **मलीक अंबर स्थायी समिती सभागृह** येथे सकाळी 11.30 वाजता **वंदेमातरम्** या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त,डॉ.पुरूषोत्तम भापकर,भा.प्र.से., नगरसचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबधीत अधिकौरी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.सुर्यकांत सुभानराव जायभाये
02. स. श्री.विजय लक्ष्मणराव वाघचौरे
03. स. श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
04. स. श्री.खान आगा मीयॉ
05. स. श्री.विकास रतनलाल जैन
06. स. श्री.रेणुकादास (राजू) दत्तोपंत वैद्य
07. स. श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
08. स. सौ.साधना गणेश सुरडकर
09. स. श्री.अमित सुधाकर भुईगळ
10. स. श्री.नासेरखॉन अब्दुल रहेमानखान
11. स. श्री.अब्दुल साजेद अ.सत्तार
12. स. श्री.मधुकर दामोधर सांवत
13. स. श्री.जुबेर गाझी असीर अहमद
14. स. श्री.प्रल्हाद गणपतराव निमंगावकर

**चर्चा :**

श्री.प्रल्हाद निमगांवकर :शहानुरमियॉं दर्गा जवळील 100 फुटी नाल्यामध्ये आठ वर्षाचा आणि सहा वर्षाच्या लहान मुलांचा बुडून मृत्यु झाला आहे त्यांना श्रंध्दाजली वाहण्यात यावी.

श्री.मधुकर सावंत :अनुमोदन आहे.

(सभागृहातर्फे 2 मिनीट स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात आली.)

मा.आयुक्त यांनी मा.सभापती यांचे सभागृहात पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

मुख्यलेखाधिकारी आणि लेखाधिकारी हे स.सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करतात.

मा.आयुक्त सभागृहासमोर अर्थसंकल्प सादर करतात.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:प्रशासनाने बजेट सादर केलेले आहे. वर्तमानपत्रातुन बातम्या येत आहे की, स्पिल ओव्हरचे कामे, मागील वर्षाचे मंजूर झालेले कामे रद्द करण्यास

मा.सर्वसाधारण सभेने आणि स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे. प्रशासनाने कोणत्या तरतुदीनुसार, अधिकार नुसार मंजूर झालेल कामे, वर्कऑर्डर झालेले, टेंडर निघालेली कामे रद्द करण्यात आली. त्याबाबतीतचा खुलासा करण्यात यावा.

श्री.रेणुकादास वैद्य :सभागृहात प्रशासनाने अर्थसंकल्प ठेवलेला आहे. अर्थसंकल्पाचा पुर्ण अभ्यास करून दोन ते चार दिवसानंतर विस्तुत प्रमाणात सर्व बाबींवर चर्चा करण्यात येईल. तरी मा.सभापती यांनी दोन ते चार दिवस अभ्यास करण्यासाठी देण्यात यावे.

श्री.मधुकर सावंत :2 जुन रोजी मा.सभापती,स्थायी समिती यांची निवड झालेली आहे. 50 दिवसांमधे प्रशासनाने बजेट का सादर केले नाही. बजेट सादर करण्यास उशीर का झाला.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:नियम 95 बाबत प्रशासनाने खुलासा करावा.

मा.सभापती :प्रशासनाने खुलासा करण्यात यावा.

नगर सचिव :मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-1949 चे कलम 95 हे आयुक्ताने दरवर्षी उत्पन्न व खर्च यांचे अंदाज तयार करणे यासंबधीचे आहे.

आयुक्ताने दरवर्षी, महानगरपालिका वेळोवेळी विहित करील अशा तारखेस किंवा तारखेपूर्वी स्थायी समिती वेळोवेळी मान्य करील अशा नमुन्यात.

अ) त्याच्यामते महानगरपालिकेने पुढील सरकारी वर्षात नगरपालिका निधीतून प्राथमिक शिक्षण निधीस महानगरपालिकेने द्यावयाच्या अनुदानाची रक्कम धरून जो खर्च केला पाहिजे किंवा करावा तो खर्च आणि त्याच्या मते {कलमे 91 अ व 91 ब या अन्वये स्थापन केलेल्या निधींसह} विशेष निधीत जमा केल्या पाहिजेत किंवा त्यातून खर्च केल्या पाहिजेत अशा काही रकमा असल्यास त्या रकमा यांचा नियमानुसार वर्गीकरण केलेला अंदाज.

ब) पुढील सरकारी वर्षाच्या सुरूवातीस पुर्नविनियोजन करण्यासाठी किंवा खर्च करण्यासाठी उपलब्ध होतील अशा कोणत्याही शिल्लक रकमा असल्यास त्यांचा अंदाज.

क)करापासून व परिवहन उपक्रमापासून मिळणाऱ्या उत्पन्नाव्यतिरिक्त पुढील सरकारी वर्षातील महानगरपालिकेच्या जमा रकमा व उत्पन्न यांचा अंदाज.

ड)पुढील सरकारी वर्षात या अधिनियमाच्या तरतुदीन्वये जे कर लादणे त्याच्या मते आवश्यक किंवा इष्ट असेल अशा कराधनासंबंधीच्या प्रस्तावांचे विवरणपत्र व कराधनापासून मिळणाऱ्या जमा रकमांचा अंदाज.

ई)पुढील सरकारी वर्षात परिवहन निधीतून बदली करावयाच्या रकमांचा अंदाज तयार केला पाहिजे व स्थायी समिती वेळोवेळी मान्य करील अशा स्वरूपात तिला सादर केला पाहिजे.

स्पष्टीकरण:- कोणत्याही विशेष निधीत कोणतीही शिल्लक उपलब्ध असल्यास ती, नियमांन्वये अशा निधीतून भागवता येईल अशा खर्चाव्यतिरिक्त अन्य खर्चाच्या बाबतीत, खंड (ब) अन्वये पुढील सरकारी वर्षाच्या सुरूवातीस

पुनर्विनियोजनासाठी किंवा खर्चासाठी उपलब्ध आहे. असे मानले जाणार नाही, आणि अशी संपूर्ण शिल्लक किंवा तिचा कोणताही भाग पुढील सरकारी वर्षाच्या सुरूवातीस अशा खर्चासाठी उपलब्ध असलेली रक्कम म्हणून हिशेबात धरली जाईल किंवा काय हे आयुक्ताने ठरविले पाहिजे.

31 जुलै 2010 पर्यंत लेखाअनुदान मंजूर आहे.

श्री.मधुकर सावंत :बजेट सादर करण्यास उशीर का झाला खुलासा करण्यात यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार: खुलासा करण्यात यावा. आयुक्ताने दरवर्षी महानगरपालिका वेळोवेळी विहीत करील अशा तारखेस याचा अर्थ काय?

मुख्यलेखाधिकारी :मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 95 अन्वये आयुक्तांने दरवर्षी, महानगरपालिका वेळोवेळी विहित करील अशा तारखेस किंवा तारखेपूर्वी, स्थायी समिती वेळोवेळी मान्य करील अशा नमुन्यात याचा अर्थ महानगरपालिका म्हणजे सर्वसाधारण सभेने ठरवुन दिलेली तारिख.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:सभेने ठरवून दिलेली तारिख आहे का. खुलासा करण्यात यावा. विषय पत्रिकेत सर्वसाधारण सभेचा काहीच उल्लेख नाही. मा.आयुक्तांचा उल्लेख आहे.

मा.सभापती :महानगरपालिका म्हणजे कोण.

मुख्यलेखाधिकारी :महापालिका म्हणजे सर्वसाधारण सभा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:विषय पत्रिकेत नमुद आहे की,मा.आयुक्त,महापालिका,औरंगाबाद यांनी लेखी मागणी केल्यानुसार सभेचे आयोजन केले आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 95 नुसार आयुक्तांने दरवर्षी वेळोवेळी विहित करीत अशा. दिनांक सर्वसाधारण सभेने निश्चित केलेली आहे का.

मुख्यलेखाधिकारी :आचारसंहिता असल्याने 1 एप्रिल 2010 ते 31 जुलै 2010 पर्यत लेखानुदान मंजूर केलेले आहे. 31 जुलै 2010 पर्यंत मुदत आहे. 31 जुलै पर्यत अर्थसंकल्प सादर करणे आवश्यक आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:31 जुलै पर्यंत अर्थसंकल्प सादर करणे बंधनकारक आहे काय?

मुख्यलेखाधिकारी :प्रशासनाने अर्थसंकल्प सादर करणे आवश्यक आहे.

श्री.मधुकर सावंत :50 दिवसांमधे प्रशासनाने बजेट का सादर केले नाही. बजेट सादर करण्यास उशीर का झाला.

मुख्यलेखाधिकारी :आचारसंहिता संपल्यानंतर सर्वसाधारण सभा, स्थायी समितीची स्थापना झाली त्यानंतर प्रशासनाने अर्थसंकल्प सादर करण्यासाठी सुरूवात केलेली आहे. वेळोवेळी स.पदाधिकारी यांचेशी चर्चा केलेली आहे. अर्थसंकल्प सादर करतांना काही आर्थिक अडचणी समोर आल्यात स.पदाधिकारी यांचेसमोर मांडण्यात आल्यात चर्चा करण्यात आली आणि त्यातुन अर्थसंकल्प सादर करण्याची चर्चा झाली व अर्थसंकल्प सादर करण्यात आलेला आहे. 31 जुलै पर्यंत लेखानुदान मंजूर आहे.

श्री.मधुकर सावंत :प्रशासनाने अर्थसंकल्प सादर केलेला आहे प्रशासनाचे मनोगत ऐकुण घेऊन चार दिवसानंतर बैठक लावण्यात यावी.

मा.आयुक्त :औरंगाबाद महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-2010 माहे एप्रिल 2010 मध्ये संपन्न झाली असून निवडणूकीच्या कालावधीत आदर्श आचारसंहितेचे पालन करणे बंधनकारक होते, त्यामुळे सन 2010-11 या वित्तीय वर्षाकरिता 01 एप्रिल 2010 ते 31 जुलै 2010 या कालावधीकरिता लेखानुदान मंजूर करण्यात आले होते.

एप्रिल 2010 मध्ये सार्वत्रिक निवडणूकीअंती निवडून आलेल्या सर्व नुतन सन्मानिय सदस्यांचे प्रशासनातर्फे मी सर्वप्रथम अभिनंदन करतो व औरंगाबाद शहरातील नागरीकांना नागरी सुविधा, आरोग्य विषयक सुविधा तसेच शहराचा स्तर उंचविण्यासाठी आवश्यक त्या विकास कामांमध्ये आपले योग्य मार्गदर्शन व मौलाचे सहकार्य मिळेल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या तरतुदीमधील कलम 95 नुसार सन 2010-11 या चालु वित्तीय वर्षाकरिताचे महानगरपालिकेच्या कारकिर्दीतील 28 वे मुळ अर्थसंकल्पिय अंदाज मा.स्थायी समितीसमोर सादर करीत आहे.

महानगरपालिकेचा आर्थिक स्तर उंचावणे हे आजमितीस क्रमप्राप्त झाले असुन या करिता नुतन सन्माननिय सदस्य, यांनी मालमत्ता कर वसुली व पाणीपट्टी वसुलीमध्ये तसेच महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी नविन स्त्रोत निर्माण करण्याकरिता पुर्ण सहकार्य करतील, अशी मी आशा बाळगतो.

सन 2010-11 चे मुळ अर्थसंकल्पिय अंदाज सादर करतांना उत्पन्नाचे मर्यादित स्त्रोत विचारात घेता वास्तविक अंदाज सादर करण्याचा प्रयत्न केला आहे, त्यानुसार वैधानिक खर्च वजा जाता उपलब्ध रक्कम विचारात घेऊन फक्त देखभाल दुरूस्तींच्या कामांकरिता प्रत्येक प्रभागासाठी आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करून देणे शक्य झाले आहे.

सन 2010-11 करिता विशेष प्रस्ताव

औरंगाबाद महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बळकट करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून मालमत्ता कर वसुली मोहिम प्रभावीपणे राबविणेसाठी वार्ड निहाय सक्षम कर्मचाऱ्यांची वसुली पथके तयार केली जातील. आवश्यकता भासल्यास प्रभावी वसुलीसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील आवश्यक तरतुदींच्या आधारे कडक पाऊले उचलण्यात येतील.

औरंगाबाद शहराची झपाटयाने होणारी वाढ विचारात घेऊन नविन मालमत्तेचा शोध तसेच पुर्वी लावण्यात आलेल्या मालमत्ता कराची शहानिशा करण्याकरिता विशेष मोहिम राबविण्यात येईल.

औरंगाबाद शहरास जायकवाडी धरणातून सुमारे 50 ते 60 कि.मी. वरून पाणी पुरवठा करावा लागतो. या करिता एकुण 07 ठिकाणी असलेल्या पंपगृहातुन एकत्रित 11500 अश्वशक्तीच्या पंपाद्वारे रात्रंदिवस पाण्याची उचल सतत करावी लागते, या करिता महानगरपालिकेस विद्युत देयकापोटी मोठया प्रमाणावर रक्कम मोजावी लागते, व पाणी पुरवठा विभागामार्फत वसुली ही

अत्यल्प स्वरूपात प्राप्त होते, तथापि नागरी मुलभूत सुविधा पुरविणे हे महानगरपालिकेचे कर्तव्य असल्यामुळे महानगपालिकेच्या इतर महसुली उत्पन्नातुन पाणी पुरवठा विभागाची तुट भरून काढावी लागते. याचा विपरीत परिणाम शहरातील विकास कामांवर होत आहे. या करिता पाणीपट्टीच्या वसुलीत वाढ करणे क्रमप्राप्त आहे व त्या दृष्टीकोनातून प्रशासनामार्फत योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच अनधिकृत नळ जोडणी शोध मोहिम राबवुन ती अधिकृत करण्याकरिता नव्याने योजना सुरू करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. तसेच शहरातील व्यापारी नळ जोडणी संख्या ही अत्यल्प आहे, यामध्ये वाढ होणे करिता विशेष शेध मोहिम राबविण्यात येईल.

औरंगाबाद शहरात आजमितीस मोठया प्रमाणावर विविध कंपन्यांचे अनधिकृत भ्रमणध्वनी मनोरे ठिकठिकाणी उभारलेले आहेत. अनधिकृत मनोऱ्यांबाबत नियमानुसार वसुली करण्याची प्रभावी कार्यवाही प्रशासनामार्फत करण्यांत येत आहे.

सफाई कर्मचाऱ्यांना सदनिका

शासनाच्या निर्देशानुसार राज्यातील महानगरपालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांचे विशिष्ट स्वरूपाचे काम विचारात घेऊन ज्या सफाई कामगारांची सेवा 25 वर्ष किंवा त्याहून अधिक झालेली आहे. अशा सफाई कामगारांना सेवानिवृत्ती नंतर किंवा सफाई कामगारांचा सेवेत मृत्यु झाल्यास त्याच्या पात्र वारसास मालकी तत्वावर 5 टक्के निधी दुर्बल घटक योजनेतंर्गत मोफत सदनिका बांधुन देणे बाबतचे निर्देश आहेत. त्या अनुषंगाने चालु वित्तीय वर्षात रूपये 25.00 लक्षची तरतुद करण्यात आलेली आहे.

बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण कायदा-2009

बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षणाचा अधिनियम 2009 अंतर्गत कृती कार्यक्रमानुसार शाळा बाहय वय वर्ष 6 ते 14 गटातील मुले व मुली यांना शैक्षणिक प्रवाहात सामावुन घेण्यासाठी नागरीकांमध्ये जन जागृती करणे, दिदी प्रकल्प, भाऊ प्रकल्पांची अंमलबजावणी करणे, इत्यादी कार्यपध्दती अंमलबजाणी करिता सन 2010-011 च्या अर्थ संकल्पात रूपये 50 लक्षाची विशेष तरतुद करण्यात आली आहे.

शासनाच्या निर्देशानुसार प्रथमच चालु वित्तिय वर्षात Poor Budget & Gender Budget चा समावेश केलेला आहे.

चालु वित्तीय वर्षात केंद्र व राज्य शासन पुरस्कृत योजनांसाठी महानगरपालिकेचे अंशदान म्हणून रूपये 5 कोटीची तरतुद करण्यात आली आहे.

केंद्र व राज्य शासन पुरस्कृत समांतर जलवाहिनी योजना कार्यान्वीत करण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

एकंदरीत महानगरपालिकेचे अपेक्षित उत्पन्न व खर्चाचा विचार करता सन 2010-11चे मुळ अंदाज रूपये 296 कोटी 38 लाख 85 हजार जमा,

दिनांक 01.04.2010 ची प्रारंभीची शिल्लक रूपये 5 कोटी 26 लक्ष 92 हजार विचारात घेऊन रूपये 57 लाख 87 हजार शिल्लकीचे अंदाज स्थायी समितीसमोर सादर करण्यात येत आहे.

चालु वित्तीय वर्षाचे मुळ अंदाज तयार करतांना माझे सहकारी अधिकारी व कर्मचारी यांनीही अविश्रांत परिश्रम घेऊन मोलाचे सहकार्य केलेले आहे.

मागील वित्तीय वर्षात राबविलेल्या प्रकल्प, योजना व विकास कामांना व्यापक प्रसिध्दी दिल्याबद्दल मी सर्व प्रसारमाध्यमांचा आभारी आहे. तसेच पुढील कालावधीतही अशाच प्रकारचे सहकार्य सर्व पत्रकार बंधु, इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमे व आकाशवाणी यांच्याकडून मिळेल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. धन्यावाद.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :अर्थसंकल्पाचा अभ्यास करण्यासाठी चार दिवसांचा अवधी देण्यात यावा.

श्री.विकास जैन :सभागृहात नविन अधिकारी आलेले आहे सभागृहास ओळख करून देण्यात यावी.

श्री.खांडेकर :एक वर्षापुर्वी सी.ओ.कॅडरमध्ये निवड झाली होती. पहिलीच पोस्टींग उपआयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद येथे झालेली आहे. वाळुज, औरंगाबाद येथे चार वर्ष पि.एस.आय. म्हणुन काम केलेले आहे. एक ते दिड महिना गडचिरोलीमध्ये काम केलेले आहे. 24 जुलै 2010 रोजी रूजु झालेला आहे. माझे नांव संतोष महादेव खांडेकर रा.पंढरपूर येथील संगोळा तालुका, सोलापुर येथील आहे. शिक्षण ॲग्रीकल्चरमध्ये पुर्ण झालेले आहे.

श्री.प्रल्हाद निमगांवकर:वार्डात नाल्यात बुडून दोन मुलांचा मृत्यु झालेला आहे त्यांचे आई वडीलांना मनपातर्फे आर्थिक मदत देण्यात यावी.

मा.सभापती :मनपातर्फे आर्थिक मदत देण्यात यावी. अर्थसंकल्पाचा अभ्यास करण्याकरीता दिनांक 29 तारखेपर्यंत वेळ देण्यात येत आहे. सभा तोपर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद